नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - १४६ | Issue - 146 | वार मंगळवार दि. १४ ऑक्टोबर २०२५ | Blow- Tuesday Date 14 October 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## एसटी कर्मचाऱ्यांना ६ हजार रुपये दिवाळी भेट : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

### पात्र कर्मचाऱ्यांना दिवाळी अग्रीम म्हणून १२ हजार ५०० रुपये देण्याचा निर्णय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : एसटीच्या ८५ हजार कर्मचारी व अधिकाऱ्यांना दिवाळी भेट म्हणून ६ हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथे जाहीर केला. तसेच, वेतनवाढीचा फरक वेतनासोबत देण्यासाठी महामंडळाला दरमहा ६५ कोटी रुपये देण्याचा आणि पात्र कर्मचाऱ्यांना दिवाळी अग्रीम म्हणून १२ हजार ५०० रुपये देण्याचाही निर्णय घेण्यात आला.

**वेतनवाढीचा फरक देण्यासाठी महामंडळाला दरमहा ६५ कोटी रुपये**

एसटीच्या सर्व कर्मचारी संघटनांची आणि कृती समितीची बैठक सह्याद्री अतिथीगृह येथे झाली, त्यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते. बैठकीस परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक, उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नविन सोना, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओमप्रकाश गुप्ता, परिवहन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी, एसटी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, सहसचिव राजेंद्र होळकर तसेच विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, राज्यात अतिवृष्टीमुळे बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे. सरकार शेतकरी बांधवांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहिले आहे. एसटी कर्मचाऱ्यांची दिवाळी देखील गोड झाली पाहिजे म्हणून शासनाने हा निर्णय घेतला आहे. एसटीला आर्थिकदृष्ट्या समृद्ध करणे गरजेचे आहे. एसटी महामंडळाचे उत्पन्न वाढण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात





येत आहेत. त्यासाठी खासगी शासकीय सहभागी तत्वावर एसटी महामंडळाच्या जागांचा विकास करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

सर्व कर्मचारी व अधिकाऱ्यांना दिवाळी भेट म्हणून ६ हजार रुपये देण्यासाठी शासनाने ५१ कोटी रुपये अनुदान देण्याचे मान्य केले आहे. तसेच २०२०-२४ दरम्यानच्या वेतन फरकाची वाढीतील रक्कम कर्मचाऱ्यांना दरमहा वेतनासोबत देण्यात येणार असून यासाठी शासनाने ६५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. याबरोबरच जे पात्र कर्मचारी सण अग्रीम घेण्यास इच्छुक आहेत त्यांना देखील पूर्वीप्रमाणे १२ हजार ५०० रुपये देण्यात येणार आहेत त्यासाठी शासनाकडे ५४ कोटी रुपयांची मागणी एसटी महामंडळाने केली आहे, असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

## मंकी पॉक्सचा शिरकाव!

### धुळ्यात आढळला पहिला रुग्ण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रशासन अलर्ट मोडवर

मुंबई : जगभरात थैमान घालणाऱ्या मंकी पॉक्सचा राज्यातील पहिला रुग्ण धुळ्यात आढळून आला आहे. त्यामुळे जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. रुग्णाचे दोन्ही रिपोर्ट पॉझिटीव्ह आल्याने हिरे रुग्णालय प्रशासनही सतर्क झाले आहे. मंकी पॉक्स हा संसर्गजन्य आजार असल्याने रुग्णाला स्वतंत्र विलगीकरण कक्षात दाखल करण्यात आले असून त्याच्या संपर्कातील व्यक्तींचा शोध घेण्यासाठी महापालिकेला कळविण्यात आले आहे. तसेच जिल्हाधिकाऱ्यांनाही याबाबत सुचित करण्यात आले आहे.

मंकी पॉक्स बाधित रुग्ण २ ऑक्टोबर रोजी तो सौदी अरेबियाहून धुळ्यातील गरीब नवाज नगर येथे आला होता. गेल्या चार वर्षांपासून तो सौदी अरेबियात वास्तव्यास आहे. त्याच्या मुलीचे लग्न असल्याने तो धुळ्यात आला होता. मात्र, येथे आल्यानंतर त्याला त्वचेचा त्रास जाणवू लागला. त्यामुळे तो दि. ३ ऑक्टोबर रोजी हिरे रुग्णालयात तपासणीसाठी गेला.

या रुग्णाने हिरे रुग्णालयातील डॉक्टरांना आपला त्रास सांगितला. डॉक्टरांना मंकी पॉक्सची लक्षणे दिसून आल्याने मनपाच्या पथकाने सदर रुग्णाच्या रक्ताचे नमूने घेतले होते. सदर सॅम्पल पुण्यातील एनआयव्हीकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. या रुग्णाचा मंक्सी पॉक्सचा रिपोर्ट पॉझिटीव्ह आला. डॉक्टरांनी शंकेचे निरसन करण्यासाठी पुन्हा रक्ताचे नमूने तपासणीसाठी पाठविले होते.

धुळ्यात आढळलेला मंकी पॉक्सचा रुग्ण हा महाराष्ट्रातील पहिलाच रुग्ण असल्याचे पुण्यातील एनआयव्हीने स्पष्ट केले आहे. मंकी पॉक्समध्ये दोन प्रकारचे व्हेरीयंट आहेत. त्यात क्लायड -१ हा दुर्मिळ व अधिक संसर्गजन्य असतो. भारतात आतापर्यंत याचे ३५ रुग्ण आढळले आहेत. तर महाराष्ट्रातील ही पहिलीच केस आहे. सदर रुग्णाला डायबेटीज असल्याने बरा होण्यासाठी वेळ लागत आहे. मंकी पॉक्स आजार पसरु नये म्हणून महापालिका व जिल्हाधिकारी यांना कळविले असल्याची माहिती रुग्णालयाने दिली आहे.

## दहावी-बारावी बोर्डाच्या परीक्षांच्या तारखा जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे: एकीकडे निवडणुकांची रणधुमाळी सुरू असताना दुसरीकडे दहावी आणि बारावी बोर्डाच्या परीक्षांच्या तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. बारावी बोर्ड परीक्षा १० फेब्रुवारी २०२६ ते १८ मार्च २०२६ या कालावधीत संपन्न होणार आहे. तर दहावी बोर्ड परीक्षा २० फेब्रुवारी २०२६ ते १८ मार्च २०२६ या कालावधीत होणार आहे. यंदाच्या वर्षी सुद्धा दहावी आणि बारावी बोर्डाच्या परीक्षा दोन आठवडे आधी घेण्याचा निर्णय शिक्षण मंडळाने घेतला आहे. कारण, १२ वी बोर्ड परीक्षा ही फ्रेब्रुवारी महिन्यात शेवटच्या आठवड्यात असते, तर दहावीची परीक्षा ही मार्च महिन्यात सुरू असते. मात्र, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र १२ वी आणि माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र १० वीच्या फेब्रु-मार्च २०२६ च्या परीक्षांच्या तारखांबाबत शासनाने परिपत्रक जारी केलं असून परीक्षा लवकर होत आहेत.



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने पुणे, नागपूर, छ. संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत आगामी फेब्रुवारी-मार्च २०२६ मधील उच्च माध्यमिक प्रमाणपत्र १२ वी आणि माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र १० वी परीक्षेच्या लेखी, प्रात्यक्षिक व इतर परीक्षा तारखांना आयोजित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार, १२ वीची लेखी परीक्षा मंगळवार १० फेब्रुवारी २०२६ ते बुधवार १८ मार्च २०२६ (माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान विषयांच्या ऑनलाईन परीक्षेसह) होणार आहे. तर, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र १० वीची परीक्षा कालावधी शुकवार २० फेब्रुवारी २०२६ ते बुधवार १८ मार्च २०२६ रोजी घेण्यात येणार आहेतच.

दरम्यान. शासनाच्या परिपत्रकानुसार १२ वी बोर्डाच्या प्रात्यक्षिक श्रेणी तोंडी व अंतर्गत मूल्यमापन तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रात्यक्षिक परीक्षा या २३ जानेवारी २०२६ ते ९ फेब्रुवारी २०२६ दरम्यान होणार आहेत. तर दहावी बोर्डाच्या प्रात्यक्षिक श्रेणी व अंतर्गत मूल्यमापन तसेच अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम प्रात्यक्षिक परीक्षा २ फेब्रुवारी ते १८ फेब्रुवारी दरम्यान होणार आहेत.

प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन तसेच छडटक्र अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम प्रात्यक्षिक परीक्षाशुकवार २३ जानेवारी २०२६ ते सोमवार ०९ फ ब्रुवारी २०२६ रोजी (माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षेसह) सोमवार ०२ फेब्रुवारी २०२६ ते बुधवार १८ फेब्रुवारी २०२६ (शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षेसह) शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय व विद्यार्थी यांना अभ्यासक्रमाचे नियोजन करण्याचे हेतूने तसेच विद्यार्थ्यांच्या मनावरील ताण कमी होण्याचे दृष्टीने फेब्रुवारी-मार्च २०२६ परीक्षेच्या प्रात्यक्षिक व लेखी परीक्षेच्या तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. उपरोक्त परीक्षांचे विषयनिहाय सविस्तर अंतिम वेळापत्रक स्वतंत्रपणे मंडळाच्या संकेतस्थळावर यथावकाश जाहीर करण्यात येईल, असेही सांगण्यात आले आहे. महामंडळाचे सहसचिव प्रमोद गोफणे यांच्या सहीने याबाबतचे परिपत्रक जारी करण्यात आले आहे.

## ईपीएफओने नियम केले सोपे; आता पीएफमधून १०० टक्के पैसे काढता येणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेने (ईपीएफओ) आपल्या ७ कोटींहून अधिक सदस्यांना एक मोठी खुशखबर दिली आहे. आता ईपीएफओचे सदस्य आपल्या भविष्य निर्वाह निधीतील जमा रकमेतून १००% पर्यंत पैसे काढू शकणार आहेत. हा महत्त्वाचा निर्णय केंद्रीय न्यास मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला, ज्याचे अध्यक्ष केंद्रीय श्रम मंत्री मनसुख मांडविया होते. या निर्णयामुळे सदस्यांना त्यांच्या अचानक उद्भवणाऱ्या आर्थिक गरजा भागवणे सोपे होईल, तसेच त्यांच्या निवृत्तीसाठीची बचतही सुरक्षित राहील. यापूर्वी, पीएफमधून आंशिक पैसे काढण्यासाठी १३ गुंतागुंतीचे नियम होते. आता हे नियम सोपे करून तीन मुख्य श्रेणींमध्ये विभागले आहेत. यामध्ये आजारपण, शिक्षण, लग्न यांसारख्या अत्यावश्यक गरजा, घर खरेदी किंवा बांधकामासारख्या निवासी गरजा आणि




काही विशेष परिस्थितींचा समावेश आहे. शिक्षण आणि लग्नासाठी पैसे काढण्याची मर्यादा पूर्वीपेक्षा वाढवण्यात आली आहे. विशेष परिस्थितीत पैसे काढण्यासाठी आता कोणत्याही कारणाचे स्पष्टीकरण देण्याची गरज भासणार नाही. यामुळे पीएफ काढण्याचे अर्ज नाकारले जाण्याची शक्यता खूप कमी होईल.

या नवीन नियमांमुळे पीएफ काढण्यासाठी लागणारा सेवेचा कालावधीही कमी करण्यात आला आहे. आता पीएफमधून आंशिक पैसे काढण्यासाठी किमान १२ महिन्यांची सेवा पूर्ण असणे आवश्यक आहे. हा एक मोठा बदल आहे, ज्यामुळे कमी सेवा झालेल्या सदस्यांनाही फायदा होणार आहे. ईपीएफओने हे देखील सुनिश्चित केले आहे की सदस्य आपल्या पीएफ खात्यात किमान २५% रक्कम शिल्लक ठेवतील. याचा उद्देश सदस्यांना उच्च वार्षिक व्याज आणि चक्रवाढ व्याजाचा फायदा मिळवून देऊन निवृत्तीसाठी एक मोठा निधी तयार करण्यास मदत करणे आहे.

ईपीएफओने मुदतपूर्व पैसे काढण्याच्या नियमांमध्येही काही बदल केले आहेत. पीएफ (ईपीएफ) मुदतपूर्व अंतिम सेटलमेंटसाठीची मुदत दोन महिन्यांवरून १२ महिने करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे, अंतिम पेन्शन काढण्याची मुदतही दोन महिन्यांवरून ३६ महिने करण्यात आली आहे. या सोप्या नियमांमुळे सदस्यांना त्यांच्या निवृत्तीसाठीची बचत किंवा पेन्शन हक्कांवर परिणाम न करता त्यांच्या तात्काळ आर्थिक गरजा पूर्ण करता येतील.

## राज्यात ढगाळ वातावरण! दोन दिवस पावसाचा प्रभाव अधिक दिसणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सध्या राज्यात पावसाचा जोर कमी झाला आहे. गेल्या आठ दिवसात राज्यात पावसानं धुमाकूळ घातला होता. यामुळं अनेक भागात पूर आले होते. त्यामुळं संपूर्ण जनजीवन विस्कळीत झालं होतं. शेतीचं घरांचं मोठं नुकसान झालं होतं. दरम्यान, पुढील आठवडाभर राज्यात कसं हवामान असेल याबाबतची माहिती ज्येष्ठ हवामान अभ्यासक माणिकराव खुळे यांनी दिली आहे.

परवा बुधवार दिनांक १५ ऑक्टोबर ते सोमवार दिनांक २० ऑक्टोबर( नरक चतुर्दशी) दरम्यानच्या सहा दिवसात महाराष्ट्रात ढगाळ वातावरण राहणार आहे. भाग बदलत तुरळक ठिकाणी मध्यम ते किरकोळ पावसाची शक्यता जाणवत असल्याची माहिती खुळे यांनी दिली. दोन दिवस म्हणजे बुधवार आणि गुरुवार दिनांक १५ ते १६ ऑक्टोबर ला संपूर्ण महाराष्ट्रात मध्यम पावसाची शक्यता अधिक जाणवत असल्याची माहिती माणिकराव खुळे यांनी दिली आहे. मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता असल्याने घाबरुन जाण्याची गरज नाही. कारण, सध्या पावसाचा जोर कमी होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे.

**आगामी निवडणुकांसाठी शरद पवारांची घोषणा**


**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची बैठक**

## राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या ५० टक्के तरुणांना संधी देणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: राज्यातील राजकीय पक्षाना आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वेध लागले असून मोर्चेबांधणी सुरु झाली आहे. एकीकडे प्रशासनाकडून जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिकांसाठी आरक्षण सोडत जाहीर होत असून दुसरीकडे राजकीय पक्षांच्या बैठका आणि रणनीती सुरू आहे. तसेच, महाविकास आघाडी आणि महायुती होणार की नाही, यावरही मंथन सुरू आहे. त्याच पार्श्वभूमीवर आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची बैठक संपन्न झाली. या बैठकीत महत्त्वाची घोषणा करण्यात आली असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या ५० टक्के तरुणांना संधी देणार असल्याचे शरद पवारांनी जाहीर केले.

शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आजच्या बैठकीत आगामी निवडणुकांसंदर्भात मोठी घोषणा करण्यात आली. जास्तीत जास्त तरुणांना संधी कशा प्रकारे देता येतील यासाठी प्रयत्न करा, अशा सूचना पदाधिकाऱ्यांना शरद पवारांकडून



देण्यात आल्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत आगामी काळात कशा प्रकारे युती करायची याबाबत महाविकास आघाडीच्या नेत्यांची उद्या बैठक पार पडणार असल्याची देखील माहिती बैठकीत देण्यात आली. येत्या आठवडाभरात स्थानिक पातळीवरील आघाडीबाबत निर्णय करा, अशा सूचनाही शरद पवारांनी पदाधिकाऱ्यांना दिल्या आहेत. दरम्यान, आपल्याकडे इच्छुकांची संख्या खूप आहे. काम करणाऱ्यांची संख्या खूप आहे, आज अल्पसंख्याक समाजाचा निर्णय घेतला असेच युवक आणि युवतींचा निर्णय होणार आहे, असे पवारांनी सांगितले.

दरम्यान, आजच्या बैठकीत शरद पवारांना धर्मनिरपेक्षता जपण्याचं आवाहनही सर्वच पदाधिकारी व कार्यकर्त्यांना केलं आहे. सातत्याने वादग्रस्त बोलणाऱ्या संग्राम जगताप यांच्या वक्तव्याचा निषेधही शरद पवारांनी नोंदवला. पूर्वी आपल्या पक्षात असणारे एक आमदार सध्या जाती-जातीत तणाव निर्माण होईल, अशा प्रकारची वक्तव्ये करत आहेत, हे अत्यंत चुकीचं आहे. जातीय सलोखा ठेवा, स्थानिक पातळीवर, राज्य पातळीवर बोलत असताना जातीवाचक बोलू नका, बोलताना प्रेमाची भाषा वापरा, आपण करत असलेल्या विधानामुळे जातीय सलोखा बिघडणार नाही याची काळजी घ्या, अशा सूचना देखील शरद पवारांनी बैठकीत दिल्या आहेत. तसेच, राजकारणात जाती धर्मावर राजकारण करण्याची महाराष्ट्राची परंपरा नाही. लोकांच्या लोकप्रियतेपेक्षा ते जास्त महत्वाचे आहे. वाचाळवीर वाढले आहेत, दुदैव आहे कोणी कोणाकडून काय खरेदी करावे यावर सरकार गप्प बसते? सरकारचा त्याला पाठिंबा आहे का? दरी निर्माण केली जातोय, असेही पवारांनी म्हटले.

अतिवृष्टीच्या संदर्भात राज्य सरकार जी मदत करत आहे, ती तटपुंजी आहे. केंद्रीय पथकाने येऊन पाहणी केली पाहिजे होती, आमच्या वेळेस केंद्रीय पथक येऊन पाहणी करुन भरघोस मदत देत होते. नरसिंह राव जेव्हा पंतप्रधान होते तेव्हा ते राज्यात अतिवृष्टीच्या पाहण्यासाठी येणार होते. पण, तेव्हा मीच त्यांना पाहण्यासाठी येऊ नका असे म्हटले. कारण, शासकीय यंत्रणा तुमच्या दौऱ्यासाठी लागेल, त्यामुळे मदतही होणार नाही, अशी माहिती शरद पवार यांनी कार्यकर्त्यांना भाषणादरम्यान दिली.

## संपादकीय....

# विद्यार्थ्यांची कसोटी

एकीकडे निवडणुकांची रणधुमाळी सुरू असताना दुसरीकडे दहावी आणि बारावी बोर्डाच्या परीक्षांच्या तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. बारावी बोर्ड परीक्षा १० फ ेब्रुवारी २०२६ ते १८ मार्च २०२६ या कालावधीत संपन्न होणार आहे. तर दहावी बोर्ड परीक्षा २० फेब्रुवारी २०२६ ते १८ मार्च २०२६ या कालावधीत होणार आहे. यंदाच्या वर्षी सुद्धा दहावी आणि बारावी बोर्डाच्या परीक्षा दोन आठवडे आधी घेण्याचा निर्णय शिक्षण मंडळाने घेतला आहे. कारण, १२ वी बोर्ड परीक्षा ही फ्रेब्रुवारी महिन्यात शेवटच्या आठवड्यात असते, तर दहावीची परीक्षा ही मार्च महिन्यात सुरू असते. मात्र, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र १२ वी आणि माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र १० वीच्या फेब्रु-मार्च २०२६ च्या परीक्षांच्या तारखांबाबत शासनाने परिपत्रक जारी केलं असून परीक्षा लवकर होत आहेत. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने पुणे, नागपूर, छ. संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत आगामी फेब्रुवारी-मार्च २०२६ मधील उच्च माध्यमिक प्रमाणपत्र १२ वी आणि माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र १० वी परीक्षेच्या लेखी, प्रात्यक्षिक व इतर परीक्षा तारखांना आयोजित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार, १२ वीची लेखी परीक्षा मंगळवार १० फेब्रुवारी २०२६ ते बुधवार १८ मार्च २०२६ (माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान विषयांच्या ऑनलाईन परीक्षेसह) होणार आहे. तर, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र १० वीची परीक्षा कालावधी शुकवार २० फेब्रुवारी २०२६ ते बुधवार १८ मार्च २०२६ रोजी घेण्यात येणार आहेतच. दरम्यान. शासनाच्या परिपत्रकानुसार १२ वी बोर्डाच्या प्रात्यक्षिक श्रेणी तोंडी व अंतर्गत मूल्यमापन तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रात्यक्षिक परीक्षा या २३ जानेवारी २०२६ ते ९ फेब्रुवारी २०२६ दरम्यान होणार आहेत. तर दहावी बोर्डाच्या प्रात्यक्षिक श्रेणी व अंतर्गत मूल्यमापन तसेच अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम प्रात्यक्षिक परीक्षा २ फेब्रुवारी ते १८ फेब्रुवारी दरम्यान होणार आहेत. तसेच विद्यार्थ्यांच्या मनावरील ताण कमी होण्याचे दृष्टीने फेब्रुवारी-मार्च २०२६ परीक्षेच्या प्रात्यक्षिक व लेखी परीक्षेच्या तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. उपरोक्त परीक्षांचे विषयनिहाय सविस्तर अंतिम वेळापत्रक स्वतंत्रपणे मंडळाच्या संकेतस्थळावर यथावकाश जाहीर करण्यात येईल.

# वाळू तस्करी विरोधात कारवाई; एक कोटी रुपयांची वाहने जप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील तालुका पोलिसांनी सोमवारी पहाटेच चिंचोली भोसे येथील वाळू तस्करावरील छापा टाकला व जेसीबी ,हायवा ,आणि तीन ट्रॅक्टर, यांच्यासह पंधरा पाच वाळू असा एक कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.



सदर आरोपीकडून संबंधित वाहनासह एकूण १५ ब्रास वाळू जप्त करण्यात आली आहे. सदर आरोपी विरोधात त्यांच्या पूर्वीच्या होण्याच्या अभिलेख अवलोकन करून कठोर अशी प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे धोरण आखण्यात आले आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे, यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टीवाय मुजावर, सहाय्यक पोलीस निरीक्षक रेळेकर, पोलीस उपनिरीक्षक भारत भोसले, विक्रम वडने साहेब फौजदार, आबा शेंडगे पोलीस हवलदार, चंद्रकांत घंटे, इसाक सय्यद कॉन्स्टेबल, बालाजी कदम ब्रह्मदेव काळे, गुटाळ चालक हसन नदाफ, आणि घाडगे यांच्या पथकाने केली.

# सासवड पोलीस स्टेशनच्या पोलिस निरीक्षकपदी कुमार कदम यांची नियुक्ती



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : पुरंदर तालुक्यातील सासवड पोलिस स्टेशनंच्या पोलीस निरीक्षक पदी कुमार रामचंद्र कदम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याअगोदर कुमार कदम यांनी वडगाव मावळ पोलिस ठाण्यामध्ये पोलिस निरीक्षक पदावर सेवा बजावली आहे. सासवडचे यापूर्वीचे पोलिस निरीक्षक ऋषिकेश भाऊसाहेब अधिकारी यांची पुणे ग्रामीण नियंत्रण कक्षात बदली करण्यात आली आहे. कुमार कदम यांच्या नियुक्तीनंतर सासवड पोलिस ठाण्याला अनुभवी पोलिस अधिकारी मिळाल्याने शहरवासीय व ग्रामीण भागा मधून समाधान व्यक्त केले जात आहे.

# तब्बल ३५ वर्षानंतर शारदा विद्यालयातील माजी विद्यार्थी एकत्र

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : आई वडिलांनंतर संस्काराची शिदोरी आणि उज्ज्वल भविष्याची वाट दाखवणारी असते. ज्या शाळेत आपण शिकलो, मोठे झालो ती शाळा आणि त्या शाळेच्या आठवणी आयुष्यात कधीही विसरल्या जात नाहीत. याच ऋणानुबंधातून

भिवंडी तालुक्यातील पडघा, शारदा विद्यालयातील जुन्या आठवणींना उजाळा देत १९९० च्या दहावी च्या बॅच तर्फे

बाबा फार्म हाऊस, जुपाडा येथे स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने तब्बल ३५ वर्षानंतर सर्व मित्रपरिवार एकत्र आला होता, बालपणीच्या आठवणीत रमलेल्या सर्व माजी विद्यार्थ्यांचे चेहरे आनंदाने फुललेले दिसत होते. उपस्थित सर्वांचा यथोचित सन्मान करण्यात आला.त्यानंतर माजी विद्यार्थ्यांनी आपला वैयक्तिक परिचय करून दिला.अनेकांनी आपल्या शैलीत जुन्या आठवणींना उजाळा दिला. त्यामधील अनेक माजी विद्यार्थी विविध पदावर कार्यरत आहेत. यावेळी टीडीसी बँकेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी संजय पाटील, बांधकाम विभागाचे अभियंता अनिल पवार, शिवसेना भिवंडी तालुका संघटक मनोहर ठाकरे, शाळेचे सेवानिवृत्त प्राचार्य रावसाहेब कुमावत, सेवानिवृत्त शिक्षक सोपान आहेर ,पोस्ट खात्याचे अनिल जाधव, गणेश गायकवाड आदी ४१ सदस्य उपस्थित होते. सर्वांनी एकत्रित स्नेहभोजन करत पुन्हा भेटू या असे सांगून निरोप घेतला.



# मार्केन हेल्थटेक लिमिटेड, नाशिकतर्फे सोलापूर सिना नदी पूरग्रस्तांना मदतीचा हात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : प्रतिनिधी ( नागेश श्रीचिप्पा) सोलापूर जिल्ह्यात मुसळधार पाऊसामुळे सिना नदीच्या पुरामुळे सोलापूर जिल्ह्यातील अनेक कुटुंबांचे मोठे नुकसान झाले. या संकटाच्या काळात मार्केन हेल्थटेक लिमिटेड, नाशिक या कंपनीने पुढाकार घेत प्रभावित नागरिकांना आवश्यक मदत पुरवून समाजसेवेचे उदाहरण घालून दिले आहे.

सीना नदी काठावरील पूरग्रस्त निमगाव, दारफळ, सुल्तानपुर इत्यादी गावांतील भागात कंपनीच्या सामाजिक जबाबदारी (उडठ) उपक्रमांतर्गत अन्नधान्य, स्वच्छ पिण्याचे पाणी, जन सामान्यांच्या गरजांची आवश्यक चादर, टौवेल, संतरंजी साहित्य वाटप करण्यात आले. तसेच स्थानिक आरोग्य विभागाच्या सहकार्याने पुढे आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करण्याचे नियोजन करण्याचे तयारी दाखवत पूरानंतर संभाव्य साथीच्या आजारांवर नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्न करण्यात आले.

मार्केन हेल्थटेक लिमिटेडच्या संस्थापक रूशी पवार व प्रवक्त्यांनी सांगितले की,

मार्केन हेल्थटेकमध्ये आम्ही आरोग्य क्षेत्रात कार्य करत असलो तरी समाजाप्रती आपली जबाबदारी प्रथम मानतो. सोलापूरमधील पूरग्रस्तांना मदत करणे ही आमची मानवी व सामाजिक जबाबदारी आहे.

स्थानिक नागरिक, प्रशासन आणि सामाजिक संस्थांनी मार्केन हेल्थटेकच्या या पुढाकाराचे मनापासून स्वागत केले असून, या मदतकार्यामुळे अनेक कुटुंबांना दिलासा मिळाला आहे.

या उपक्रमाद्वारे मार्केन हेल्थटेक लिमिटेड, नाशिक यांनी पुन्हा एकदा आपली समाजसेवेच्या माध्यमातून आरोग्यदायी भारताची बांधिलकी अधोरेखित केली आहे.

या साठी स्थानिक पातळीवर स्वयंसेवी संस्था, सामाजिक संस्था, ध्येय प्रतिष्ठान, गणेश गाडेकर, अण्णा साहेब मोरे, महादेव थोरात, रफी सय्यद, भगवान मुकणे, बाळासाहेब मोरे.माढा यांचे सहकार्य लाभले आहे.




# सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावरील हल्ल्याचा पुरंदरमध्ये निषेध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर:प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर बूट फेकून हल्ला करणाऱ्या मनुवादी मानसिकतेच्या राजेश किशोर तिवारीवर राष्ट्रद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी अखिल पुरंदर तालुका संविधान व लोकशाही प्रेमी नागरीक संघाच्या वतीने व पुरंदर तालुका बहुजन महापुरुष संयुक्त जयंती महोत्सव समितीच्या वतीने सासवड पोलीस स्टेशनचे नवनिर्वाचित पोलीस निरीक्षक कुमार कदम यांना लेखी निवेदन देऊन करण्यात आली.



अखिल पुरंदर तालुका संविधान व लोकशाही प्रेमी नागरीक संघ व पुरंदर तालुका बहुजन महापुरुष संयुक्त जयंती महोत्सव समितीच्या वतीने, सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई साहेब यांच्यावर झालेल्या भ्याड व संतापजनक हल्लयाच्या निषेधार्थ निषेध सभा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज क्रांतीसुर्य महात्मा फुले प्रज्ञासुर्य महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन करण्यात आले, यावेळी ज्येष्ठ नेते सुदामआप्पा इंगळे, राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष प्रदिप आण्णा पोमण, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष माणिकराव झेंडे पाटील, आपचे जिल्हाध्यक्ष दत्तात्रय कड, रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे प्रदेश सरचिटणीस विष्णूदादा भोसले, बहुजन हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष सुनिलतात्या धिवार, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते बंडूकाका जगताप, रिपब्लिकन पक्षाचे तालुकाध्यक्ष बळीराम सोनवणे,बहुजन हक्क परिषदेचे नेते नानासाहेब मदने, रिपब्लिकन पारधी आघाडीचे नेते पुरुषोत्तम पवार, जयमल्हार क्रांती संघटनेचे नेते प्रा गंगाराम जाधव, यशवंत भांडवलकर जेष्ठ समाजसेवक महादेव खेंगरे पाटील, सासवड नगरपालीका बांधकाम समितीचे माजी सभापती सोपानराव रणपिसे भारतीय बौध्द महासभेचे माजी अध्यक्ष बाळासाहेब पोळ, रिपाइं नेते नामदेव नेटके डॉ. विनायक गायकवाड, बहुजन हक्क परिषदेचे नेते संतोष डुबल, सामाजिक कार्यकर्ते महादेव भोंडे बहूजन महापुरुष संयुक्त जयंती महोत्सव समितीचे विश्वस्त सुनिल जगताप, अखिल भारतीय कोल्हाटी डोंबारी संघटनेचे नेते, मनोहर ताथवडकर, बहुजन हक्क परिषदेचे कैलास धिवार सासवड नगरपालिका पथारी संघटनेचे संचालक गुलाबराव सोनवणे रिपब्लिकन पक्षाचे युवक अध्यक्ष, स्वप्नील पाटोळे , बळवंत गरुडसर रिपाइंचे नेते कालीदास उबाळे सचिन कांबळे, प्रकाश कदम तानाजी भालेराव, रंजित भालेराव प्रितम आठवले, रमेश रणदिवे, संदेश सोनवणे संदेश यादव पत्रकार छायाताई नांदगुडे, वाय पी भांडवलकर, माहिती अधिकार कार्यकर्ते साधू भोसले रोहीदास कुदळे, सचिन भोंडे, रामदास माळवदकर लक्ष्मण निगडे, पत्रकार अजिम आतार आनंद गुरव, रविंद्र क्षिरसागर राजु भोंडे सिध्दार्थ यादव, अविनाश कांबळे, वंदना पायगुडे, सुनिल धुमाळ, शंकर यादव, सिंधुताई काकडे, संदीप चौंडकर, खंडू चोरमले, रोहीदास कुदळे, बापूराव पाटोळे, आनंद पाटोळे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते, यावेळी सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर हल्ला करणाऱ्या मनुवादी मानसिकतेच्या राकेश तिवारी यांच्यावर राष्ट्रद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी केली,

# कळंब येथे सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्र सुरू करण्याची मागणी : बब्रुवान गोरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : कळंब येथे सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्र सुरू करण्याबाबत शेतकऱ्यांच्या वतीने बब्रुवान गोरे यांच्या नेतृत्वाखाली कळंब चे तहसीलदार मा.हेमंत ढोकले यांना दि.१३ ऑक्टोबर २०२५ रोजी निवेदन देऊन मागणी करण्यात आली आहे. दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, शेतकऱ्यांच्या सोयाबीन पिकांची काढणी मळणी सुरू आहे, तसेच शेतकऱ्यांची सोयाबीन विक्रीसाठी तयार असून सोयाबीन विक्री करण्यासाठी खुल्या बाजारात शेतकरी घेऊन जात आहेत. परंतु शेतकऱ्यांचे सोयाबीन शासनाने ठरवून दिलेल्या हमी भावापेक्षा कमी दराने खरेदी अंदाजे तीन हजार ते चार हजार रुपये पर्यंत व्यापारी खरेदी करून शेतकऱ्यांची लूट करत आहेत. यापूर्वी शेतकऱ्यांचे अतिवृष्टीमुळे सोयाबीन पिकांचे अतोनात नुकसान झालेले आहे. त्यामुळे अधीच शेतकरी अडचणीत सापडलेला आहे. तर काही दिवसांवर दिवाळी हा सण जवळ आला असून रब्बी पेरणी सुद्धा शेतकऱ्यांना करणे आवश्यक आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना खते, बी, बियाणे खरेदी करण्यासाठी आर्थिक टंचाईचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना सोयाबीन विक्री केल्याशिवाय पर्याय नाही. शेतकऱ्यांच्या जवळील सोयाबीन मोठ्या प्रमाणात व्यापाऱ्यांकडून खरेदी झाल्यानंतर शासनाचे हमीभाव खरेदी केंद्र सुरू होतात. त्यामुळे त्याचा मोठ्या प्रमाणात शेतकर्यांना तोटा तर व्यापार्यांनाच फायदा होतो. त्यामुळे आपण सोयाबीन हमीभाव केंद्र तात्काळ सुरू करण्याचे आदेश देऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. दिलेल्या निवेदनावर बब्रुवान गोरे, मानव अधिकार आंदोलन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष हनुमंत भाऊ पाटुळे, प्रवीण जाधव, अमोल शिंगटे, नेताजी कवडे, बप्पासाहेब जावळे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# भैरवनाथ शुगरचा अग्निप्रदीपन शुभारंभ: कारखान्याची ६ लाख मे.टन. गाळपाचे उद्दिष्ट : चेअरमन अनिल सावंत

## मंगळवेढा तालुक्यातील लवंगी येथील भैरवनाथ शुगर बॉयलरचा अग्निप्रदीपन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : बहनात शुगर चा बारावा गणित हंगाम ाचा बॉयलर अग्नी प्रदीपन शुभारंभ उत्साहात कारखान्याचे सहा लाख मीटर गाळपाचे उद्दिष्ट पूर्ण करू असे चेअरमन अनिल सावंत यांनी शेतकऱ्यांना आश्वासन दिले.

मंगळवेढा तालुक्यातील लवंगी येथील भैरवनाथ शुगर बॉयलरचा अग्निप्रतीपण श्री ह. भ. प. बाळास-ाहेब महाराज (मठाधिपती) व श्री बाळकृष्ण माऊली मंदिर नंदेश्वर यांच्या शुभहस्ते बॉयलर पूजन शुभारंभ करण्यात आला.

भैरवनाथ उद्योग समूहाचे चेअरमन अनिल दादा सावंत, वाय चेअरमन केशव सावंत व रतनशहा बँकेचे चेअरमन राहुल शहा शेडजी यांच्या व इतर सर्व मान्यवरांच्या उपस्थित संपन्न झाला.

यावेळी सत्यनारायण महापूजा श्रीपती माने सरकार यांच्या सुविद्य पत्नी सौ चंद्रभागा व देवानंद पाचले यांच्या सुविधा पत्नी सौ प्रीती यांच्या शुभहस्ते बॉयलरचे व कारखान्याची पूजा करण्यात आली.

कार्यक्रमाच्या वेळी कारखान्याची चेअरमन अनिल दादा सावंत म्हणाले की प्रा. डॉक्टर तानाजीराव सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली पाठीमागील अकरावा गणित हंगाम यशस्वीरित्या पूर्ण केलेला आहे. त्याच विश्वासहार्त चालू गळीत हंगाम पूर्ण करेल असे आश्वासन दिले.

यासाठी लागणारी सर्व ऊस तोडणी वाहतूक यंत्र कार्यावंत असल्याने सांगण्यात आले. कारखान्याची संस्थापक माजी आरोग्य मंत्री प्रा डॉक्टर तानाजीराव सावंत यांनी कारखान्याचे सहा लाख मिलिटरी टन गाळपाचे उद्दिष्ट दिलेले आहे हे आम्ही पूर्ण करू अशी आश्वासन चेअरमन अनिल दादा सावंत यांनी यावेळी दिले. यावेळी माजी पालकमंत्री लक्ष्मणराव ढोबळे श्रीमंत दामाजी सहकारी व चेअरमन तानाजी खरात, संचालक बसवराज पाटील, राष्ट्रवादी शहर प्रमुख चंद्रशेखर कोंडू भैरी, मुछफार काझी सचिन नकाते, माऊली काळे, सुनील भोसले, राजकुमार पाटील तुकाराम भोजने, साहेबराव पवार, अनिल पाटील दादासाहेब पवार, शिवशंकर कौसाळे, संगीता ताई कट्टे स्मितताई अवघडे जमेरी इनामदार व श्रीमती माने सरकार, रामचंद्र जाधव चंद्रकांत देवकर तान-ाजी चव्हाण, समाधान जाधव, श्याम गोगाव ( सर), नितीन पवार, लक्ष्मण पवार, सिताराम भगरे, संगीता पुरे, व भैरवनाथ शुगरचे जनरल मॅनेजर बाळासाहेब शिंदे, वर्स मॅनेजर नानासाहेब पोकळे, मुख्य शेतकरी अधिकारी शिव-ाजी चव्हाण, शेतकी अधिकारी कृष्णदेव लोंढे, चीप अकाउंटंट देवानंद पासले, एच आर मॅनेजर संजय राठोड, ईडीपी मॅनेजर गजानन माने देशमुख, केनियार्ड सुपरवायझर शंकर पाटील, तोडकीपर केदार साबणे, इलेक्ट्रिक इंजिनिअर संतोष माळी सुरक्षा अधिकारी प्रकाश कांबळे कार्यालय अधीक्षक अभिजीत पवार व कर्मचारी गुंड यांच्यासह सर्दी सरपंच मान्यवर पत्रकार बांधव ऊस उत्पादक शेतकरी, तोडणी वाटपदार ठेकेदार, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बीडमध्ये संतापजनक घटना! 'लक्ष्मी देवी' मूर्तीची विटंबना; दगडाने मूर्तींची तोडफोड, अज्ञात आरोपी मोकाट!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बीड/प्रतिनिधी : बीड शहराला हादरवून सोडणारी एक अत्यंत गंभीर आणि संतापजनक घटना आज सकाळी उघडकीस आली आहे. शहरातील प्रसिद्ध कंकालेश्वर मंदिराच्या मागील बाजूस, सर्वे नंबर ९० मध्ये असलेले जागृत देवस्थान श्री लक्ष्मी आई मंदिरात पहाटे ६ वाजण्याच्या सुमारास समाजकंटकांनी मंदिराची व मूर्तीची तोडफोड करण्याचा घृणास्पद प्रयत्न केला.

या पवित्र स्थळाला गेल्या काही काळात वारंवार लक्ष्य केले जात आहे. यापूर्वी अशा प्रकारची विटंबना दोन ते तीन वेळा घडली असून, वारंवार तक्रारी दाखल करूनही हा प्रकार थांबत नसल्याने आता समस्त हिंदू धर्मीयांमध्ये तीव्र संतापाचे आणि असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**नेमके काय घडले?**



लक्ष्मी आई देवस्थानात दरवर्षी म ोठ्या प्रमाणात जत्रा भरते आणि दररोज सकाळी भक्त दर्शनासाठी येतात. आज सकाळी नितीन रमेश कांबळे हे दर्शनासाठी जात असताना त्यांना हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. अज्ञात समाजकंटकांनी दगडांचा वापर करून देवीच्या मूर्तीची जाणीवपूर्वक तोडफोड करण्याचा प्रयत्न केल्याचे उघड झाले. या हल्ल्यात देवीच्या मूर्तींचे तसेच मंदिराचेही मोठे नुकसान झाले आहे.

या वारंवार घडणाऱ्या घटनांमुळे सम ाजाच्या भावना तीव्रतेने दुखावल्या गेल्या आहेत. बीड शहरातील महत्त्वाचे धार्मिक स्थळ वारंवार लक्ष्य होत असतानाही, यावर कायमस्वरूपी उपाययोजना न केल्याबद्दल प्रशासनाच्या दुर्लक्षाबद्दल आता गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

**पोलीस आणि राजकीय नेत्यांची तातडीची भूमिका :**

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी तात्काळ मंदिराच्या ठिकाणी पंचनामा करण्याची प्रक्रिया पूर्ण केली आहे. या दरम्यान, समाजाने आणि विविध संघटनांनी या घटनेचा जाहीर निषेध केला.

सकल हिंदू सेनेसह विविध हिंदू संघटनांच्या वतीने जाहीर निषेध करत, आरोपीला तात्काळ पकडून कठोर कारवाई करून शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. समाजाच्या भावना दुखावल्याची घटना असल्याने सर्व समाज एकत्र आला.

या घटनेची माहिती मिळताच, राष्ट्रवादीचे डॉ. योगेश भैया क्षीरसागर यांनी तातडीने घटनास्थळी भेट दिली. त्यांनी पोलीस प्रशासनाला आरोपीला ताबडतोब अटक करून शिक्षा द्यावी असे आदेश दिले. यावेळी संतोष अण्णा पाबळे, पिंटू भाऊ पवार, राणा चव्हाण, शिवसेना चे जिल्हा उपप्रमुख मामा जाधव, दत्ता गुणवंत, सुनील कांबळे, रंजीत घेणे, पुजारी योगीराज कांबळे तसेच इतर समाज बांधव व हिंदू बांधव मोठ्या संख्येने उप-स्थित होते.

**पुढील कार्यवाही :**

पोलिसांनी तातडीने तक्रार नोंदवून घेतली असून, अज्ञात आरोपींचा शोध घेण्यासाठी परिसरातील सीसीटीव्ही फ ुटेज तपासले जात आहेत. मात्र, अद्याप कोणत्याही आरोपीला पकडण्यात यश आलेले नाही आणि पुढील कारवाई अजूनही सुरूच आहे. भाविकांच्या तीव्र भावना लक्षात घेता, प्रशासनाने या गंभीर प्रकरणात तात्काळ आणि कठोर पाऊले उचलणे अपेक्षित आहे.

या घटनेमुळे बीड शहरात तणावाचे वातावरण असून, पोलीस प्रशासन या वारंवार घडणाऱ्या प्रकारांना कसा आळा घालते आणि आरोपींवर कठोर कारवाई कधी करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.





# दावतपूर येथे आरोग्य शिबीर संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : आज रोजी मौजे दाऊतपुर तालुका औसा जिल्हा लातूर येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत व माजी वसुंधरा अभियानांतर्गत स्वस्त नारी सशक्त परिवार गावामध्ये निमिया ग्रस्त महिलांची संख्या किती आहे हे समजण्यासाठी महिलांचे हिमोग्लोबिन सीबीसी तपासणी करण्यासाठी शासकीय आरोग्य उपकेंद्र यांच्याकडून शिबिराचे आयोजन करण्यात आले या शिबिरास महिलांचा मोठ्या प्रमाणात सहभाग दिसून आला जवळपास १०२ महिलांची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली सदरील शिबिरास सरपंच शिवदास आबाजी कांबळे उपसरपंच विठ्ठल बेड जवळ-गे ग्रामपंचायत अधिकारी रेखा मधुकर चलमले डॉक्टर वसीम शेख आरोग्य सेवक आरोग्य सेविका अशा कार्यकर्ते ग्रामपंचायत सदस्य व धाराशिव वारताचे वृत्त संपादक श्री सतीश चंद्र बिराजदार उपस्थित होते व या सर्वांचे सहकार्याने शिबिर यशस्वी झाले.

# देशाचे सरन्यायाधीश यांच्यावर सर्वोच्च न्यायालयाच्या परिसरात झालेल्या भ्याड हल्ल्याचा मेहकर येथे निषेध



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी :

बुलढाणा- मेहकर येथे आंबेडकरी चळवळीचे युवा नेते तथागत ग्रुपचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष संदिप गवई व राष्ट्रीय कार्याध्यक्ष कुणाल माने यांच्या नेतृत्वाखाली मेहकर नायाब तह-सीलदार अजय पिंपरकर साहेब यांना निवेदन देण्यात आले .व निवेदनात नमुद करण्यात आले की, सर्वोच्च न्यायालयाच्या परिसरात देशाचे सरन्यायाधीश यांच्यावर झालेला हल्ला हा केवळ व्यक्तीवरचा हल्ला नसून, भारतीय न्यायव्यवस्था, संविधान आणि लोकशाही व्यवस्थेवर झालेला गंभीर प्रहार आहे. या भ्याड कृत्याचा आम्ही तथागत ग्रुप म हाराष्ट्र राज्य संघटनेच्या वतिने तीव्र शब्दांत निषेध करतो. न्यायव्यवस्था हीच लोकशाहीची खरी हमी आहे आणि त्या व्यवस्थेचे सर्वोच्च पद भूषविणार्या व्यक्तीवरच जर अशा प्रकारचा हल्ला झाला, तर तो संपूर्ण राष्ट्रासाठी चिंताजनक आहे. सम ाजात भीती आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण करण्याचा, तसेच न्यायावरचा विश्वास डळमळीत करण्याचा कपटी प्रयत्न आहे. सर्वोच्च न्यायालयाचा परिसर जो देशातील न्यायमंदिर मानला जातो तिथेच अशा प्रकारची घटना घडणे हे अतिशय चिंताजनक आहे. लोकशाहीच्या पाया रचणाऱ्या प्रमुख खांबांमध्ये न्यायव्यवस्था ही सर्वात महत्त्वाची आहे. या न्यायव्यवस्थेचे सर्वोच्च पद भूषविणाऱ्या सरन्यायाधीशांवरच जर हल्ला घडला, तर तो केवळ एखाद्या व्यक्तीवर झालेला आघात नसून, भारतीय संविधान, कायदा आणि लोकशाही व्यवस्थेवरच झालेला थेट प्रहार आहे. असा हल्ला हा न्यायव्यवस्थेची प्रतिष्ठा डागाळण्याचा सरन्यायाधीशांवर भ्याडपणे हल्ला करणाऱ्यांचा निषेध करणे पुरेसे नाही, तर अशा प्रवृत्तींचा कायमस्वरूपी बंदोबस्त करणे गरजेचे आहे. गुन्हेगारांना तातडीने अटक करून कठोरात कठोर शिक्षा देणे हे न्यायव्यवस्थेप्रती खरी बांधिलकी ठरेल. या घटनेम ुळे नागरिकांमध्ये संताप आहे आणि हा संताप स्वाभाविकही आहे. कारण हल्ला म्हणजे देशा-तील सामान्य माणसाच्या हक्कांवर आणि सुरक्षिततेवर हल्ला होय. समाजाने, माध्यमांनी आणि सत्ताधाऱ्यांनी मिळून या प्रकरणात स्पष्ट व ठाम भूमिका घेतली पाहिजे. न्यायालयाची प्रतिष्ठा, संविधानावरील विश्वास आणि लोकशाहीचे रक्षण ही आपल्या सर्वांचीच जबाबदारी आहे. या घटनेत सामील आरोपींना तात्काळ अटक करून कठोरात कठोर शिक्षा दिली जावी, अशी आमची ठाम मागणी आहे. न्यायालयाचे गौरव, प्रतिष्ठा आणि स्वायत्तता यांचे रक्षण करणे हे सर्वसामान्य जनतेचे, माध्यमांचे तसेच शास-नाचे सामूहिक कर्तव्य आहे.

यावेळी समस्त आंबेडकरी चळवळ व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## महागाई आणि पीक नुकसानीमुळे आदिवासी विक्रेत्यांच्या चेहऱ्यावर निराशा

# पडघा आठवडा बाजारात 'बंध' विक्री कमी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




ठाणे प्रतिनिधी/ मिलिंद जाधव :भिवंडी तालुक्यातील प्रसिद्ध पडघा आठवडा बाजारात रविवारी बंध (बांबूपासून बनवलेली दोर) विक्रीसाठी आलेल्या आदिवासी कुटुंबांच्या चेहऱ्यावर नाराजी आणि चिंता दिसून आली. गेल्या काही दिवसांत मुसळधार पावसामुळे परिसरातील भात शेतीसह इतर पिकांचे मोठे नुकसान झाले असून, त्यावर महागाईचा तडाखाही लागल्याने या पारंपरिक व्यवसायावर परिणाम झाला आहे.

बांबूपासून बनविलेल्या बंधांची गरज भात कापणीच्या हंगामात जास्त असते. गावोगावी भाताची कापणी सुरू होण्यापूर्वी शेतकऱ्यांना भाताचे भारे बांधण्यासाठी हे बंध वापरावे लागतात. स्थानिक आदिवासी बांधव बांबू ठेचून चार,पाच दिवस सुकवून हा माल बनवतात आणि गाव-गावांतल्या आठवड्याच्या बाजारात विक्रीसाठी आणतात. हा व्यवसाय वर्षातून एकदाच, साधारण सात , आठ दिवस चालतो आणि अनेक कुटुंबांसाठी महत्त्वाचा अतिरिक्त उपार्जनाचा मार्ग असतो.

या वर्षीपर्यंत दरवर्षी शेकड्याला १५० ते २०० रुपयांना विकला जाण-ारा बंध यंदा महागाईमुळे २५० ते ३०० रुपयांपर्यंत पोहोचला आहे. काही विक्रेत्यांचे म्हणणे आहे की शेकड्याची किंमत ३०० रुपये झालेली आहे आणि एका बंधाची बाजारभाव अंदाजे २.५० ते ३ रुपये आहे. तरीही, वाढत्या दरांमुळे खरेदी करणाऱ्यांची संख्येत घट झाल्याने विक्रेत्यांना अपेक्षित कमाई मिळत नाही. सामान्यतः एका विक्रेत्याला या कामातून साधारण २५०० ते ३००० रुपये मिळत असतात; परंतु यंदा विक्री कमी असल्याने अनेकांना हा आकडा मिळत नाही.यावेळी पाच्छापूर,उबरखांड, नेवाडा, खा-तीवली, दहागाव, सारमाल, डोहोळे,पडघा तर आदी ठिकाणाहुन आदिवासी महिला व पुरुष 'बंध' विक्रीसाठी आले होते. या कुटुंबांमध्ये संपूर्ण कुटुंब एकत्र कामात गुंतलेले असते - बंध बनविणे, सुकविणे, बाजारात नेणे आणि विक्री करणे ही प्रक्रिया सर्वांच्या सामूहिक कष्टातून होते. विक्रीचा हाच काळ त्यांच्या वर्षातील महत्त्वाचा आर्थिकाधार असतो ज्यावर दिवाळीचा खर्च आणि रोजच्या खर्चाचा भाग अवलंबून असतो. महागाईमुळे आता घाऊक खरेदी कमी झाली आहे. काही शेतकऱ्यांनी सांगितले की भातकापणीसाठी आवश्यक वस्तूंच्या किंमती वाढल्याने आधीच्या प्रमाणात बंध खरेदी करणे कठीण झाले आहे. त्यामुळे काही शेतकरी पर्यायी दोरीचा ,पट्टीचा उपयोग करतात. असे स्थानिक शेतकऱ्यांनी बोलतांना सांगितले. मुसळधार पावसामुळे पिकांचे नुकसान आणि महागाईचे एकत्रित परिणाम असलेल्या या आव्हानात्मक काळात आदिवासी कुटुंबांना तातडीने पर्यायी रोजगार किंवा बाजारात विक्री वाढवण्यासाठी उपाययोजना आवश्यक आहेत. स्थानिक प्रशासन किंवा स्वयंसेवी संस्था शेतकऱ्यांना आणि विक्रेत्यांना आर्थिक मदत, सवलत किंवा स्थानिक बाजारातील विक्रीस प्रोत्साहन देणाऱ्या कार्यक्रमांचे आयोजन करू शकतात, असे स्थानिकांनी सु-चवले. एकंदरीत, पडघा आठवडा बाजारात बंध विक्रीच्या हंगामात यंदा किमती जरी वाढल्या असल्या तरी बंध विक्री करणाऱ्या आदिवासी बांधवाच्या चेहऱ्यावर नाराजी दिसून आली. ज्याम ुळे त्यांच्या दिवाळीचे आणि रोजच्या खर्चाचे अनिश्चितपण वाढले आहे.

**भर उन्हात आम्हाला बंध विक्रीसाठी थांबावे लागते. दरवर्षीप्रमाणे चांगली विक्री झाली नाही – दोन पैसे मिळतील अशी आशा बाळगूनच आम्ही हा काम करतो.**

**बंध विक्रेत्या, सुनिता कालचींदा**





# बिल्डर असोसिएशनच्या चेअरमनपदी समाधान काळे, ता. उपाध्यक्षपदी संजय साठे यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : बिल्डर असोसिएशनच्या ऑफ इंडिया संलग्नित पंढरपूर सेंटरच्या चेअरमन पदी यशराज इंटरप्राईजेस चे प्रमुख सम ाधान काळे तर उपाध्यक्षपदी संजय साठे यांची एक मताने निवड करण्यात आली पंढरपूर बुलढाणा असोसिएशनच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण समारंभ आमदार समाधान आवताडे यांच्या अध्यक्षतेखाली राज्याचे बिल्डर असोसिएशनचे चेअरम जगन्नाथ जाधव, व सेक्रेटरी मनोज देशमुख, माझी चेअरमन दत्तात्रय मुळे, पुणे सेंटरचे चेअरमन अजय गुजर, कार्यकारी अभियंता अमित निमकर, सोलापूर सेंटरचे चेअरमन संतोष कलगुडगी, प्रणव परिचारक युवराज चुंबळकर, आशिष शहा अरबी जाधव, शांतीलाल डबल, धनाजी बागल आदी उपस्थित होते.

पतग्रहण समारंभात सचिव सुजित पाटोळे, सहसचिव सित-ाराम माने, खजिनदार रंजीत लोंढे पाटील, यांची निवड करण्यात आली व यावेळी युवा नेते प्रणव परिचारक, उद्योजक मुन्ना भोसले, विवेक साळुंखे यांनी असोसिएशनचे सभासदत व स्वीकारले व प्रास्ताविक उपाध्यक्ष संजय साठे यांनी केले, सूत्रसंचालन समाधान काळे यांनी तर सहसचिव सिताराम माने यांनी आभार मानले.

# बुद्धाचे तत्त्वज्ञान आज संपूर्ण जग अंगीकारत आहे : डॉ. बबन जोगदंड

## बार्टी संस्थेने विविध उपक्रमांद्वारे साजरा केला धर्मांतर घोषणा दिन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : दिनांक १३ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सारा भारत बौद्धमय करण्याचे स्वप्न होते, ते बऱ्याच अंशी साकार होताना दिसत आहे. हळूहळू संपूर्ण जग बुद्धांचे तत्त्वज्ञान अंगीकृत करण्याच्या मार्गावर आहे, असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन प्रशिक्षण संस्थेतील विभाग प्रमुख डॉ. बबन जोगदंड यांनी मांडले. ते बार्टी मुख्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या धम र्मांतर घोषणा दिन कार्यक्रमानिमित्त बोलत होते.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भार-तरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने असलेली (बार्टी) पुणे ही संस्था देशातील एक अग्रगण्य संस्था आहे.ही संस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार पुढे नेण्यास कटिबद्ध आहे. बाबासाहेबांच्या जीवनातील अनेक प्रसंग, घटना या क्रांतिकारी होत्या. त्या घटनांना बार्टी विविध कार्यक्रम, उपक्रमाद्वारे उज-ाळा देते. धम्मचक्र प्रवर्तन दिन, धर्मांतर घोषणा दिन, चंद्रपूर धर्मांतर सोहळा हे ऑक्टोंबर महिन्यातील ऐतिहासिक दिनविशेष असून १३ ऑक्टोबर १९३५ साली डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी येवला येथे धर्मांतराची घोषणा केली. ती घोषणा त्यांनी १४ ऑक्टोंबर १९ ५६ साली बौद्ध धम्माचा स्वीकार करून पूर्ण करून दाखवली . आज संपूर्ण जगच बुद्धाच्या विज्ञानवादी मानवतावादी बौद्ध धम्माचा स्वीकार करत आहे.

डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संस्थेच्यावतीने मा. महासंचालक सुनिल वारे यांच्या मार्गदर्शनाखाली भार-तरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर मुक्ती भूमी स्मारक येवला येथे स्मारकास रंगरंगोटी, विद्युत रोषणाई, अभिवादन नियोजन तसेच सवलतीच्या दरात डॉ बाबासाहेब आंबेडकर व इतर महापुरुषांचे ग्रंथ, शासकीय खंड, भारताचे संविधान, आदी ग्रंथ भीम अनुयायांना उपलब्ध करून देण्यात आले. याचा अनुयायांनी मोठ्या प्रमाणात लाभ घेतला. या पुस्तक स्टॉलचे उद्घाटन महासंचालक सुनील वारे यांच्या हस्ते येवला येथे करण्यात आले..तसेच धर्मांतर घोषणा दिनानिमित्त येवला मुक्तीभूमी स्मारकासमोरील भार-तरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास संस्थेचे महासंचालक सुनिल वारे यांनी पुष्पमाला अर्पण करून विनम्र अभिवादन केले.यावेळी मुक्तीभूमी स्मारक येवला व बार्टीतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

मुख्यालयात झालेल्या कार्यक्रमात विभागप्रमुख अनिल कांरडे यांनी मार्गदर्शन करताना आपण सर्वांनी आर्य अष्टांगिक मार्ग, पंचशीलाचे पालन करावे आणि सुखी जीवन जगावेअसे आवाहन केले. तसेच विपश्यनेचे महत्त्व विशद केले.

बार्टी मुख्यालयातील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस व बुद्धरु-पास विभागप्रमुख श्रीमती स्नेहल भोस-ले, वषाली शिंदे, डॉ बबन जोगदंड, लेखाधिकारी नितिन चव्हाण यांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सुत्रसंचलन रामदास लोखंडे यांनी केले. आभार श्रीमती वैशाली खांडेकर यांनी मानले.

# पंढरपूर पंचायत समितीच्या गणासाठी आरक्षण जाहीर: महिलांसाठी आठ जागा राखीव, व सर्वसाधारणसाठी पाच जागा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंचायत समिती गणासाठी प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगोटे, गटविकास अधिकारी अमोल जाधव, निवडणूक नायब तहसीलदार वैभव बुचके, यांच्या उपस्थितीत आरक्षण जाहीर करण्यात आले यामध्ये १६ पैकी ११ जागा विविध प्रवर्गासाठी आरक्षित झाले असून पाच जागा सर्वसाधारण साठी आहेत. त्या आरक्षणात महिलांसाठी आठ जागा राखीव ठेवण्यात आले आहे असून अनुसूचित जातीसाठी दोन जागा मागास प्रवर्गासाठी दोन महिला प्रतिनिधित्व देण्यात आले आहे.

यामध्ये उंबरे (सर्वसाधारण), करकंब (सर्वसाधारण), भोसे (ना.मा. प्र. महिला) गुरस-ाळे (सर्वसाधारण), रोपळे (सर्वसाधारण महिला), सुसते (अनुसूचित जाती महिला) पुळुज (ना.मा. प्र. महिला ) गोपाळपूर (सर्वसाधारण म हिला), वाखरी (ना.मा. प्र.) पटवर्धन कुरोली (सर्वसाधारण महिला), भाळवणी (ना.मा. प्र ), पळशी (अनुसूचित जाती जमाती महिला), टाकळी (सर्वसाधारण), खर्डी (अनुसूचित जाती), कासेगाव (सर्वसाधारण), सरकोली ( सर्वसाधारण महिला) याप्रकारे सोडत काढण्यात आले.

# राज्यातील प्रत्येक शासकीय शाळेत पोहचणार जागतिक दर्जाचे शिक्षण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : गणित आणि विज्ञान विषयातील प्रत्येक विद्यार्थ्याचे पायाभूत ज्ञान दृढ करण्यावर शास-नाने भर दिला आहे. या उद्देशाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्र शासनामार्फत 'डॉ. जयंत नारळीकर गणित आणि विज्ञान अध्ययन समृद्धी कार्यक्रम' राबविण्यासाठी खान अकॅडमीसोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. वैज्ञानिक दृष्टीकोन आणि कुतूहल यांचा वारसा विद्यार्थ्यांम ध्ये रुजविणारे प्रख्यात वैज्ञानिक डॉ. जयंत नारळीकर यांच्या सन्म ानार्थ हा उपक्रम राबविला जात असून सुमारे ५० लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना याचा लाभ होईल.

या कार्यक्रमांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये राज्यातील सुमारे ६२ हजारांहून अधिक जिल्हा परिषद शाळांमध्ये इयत्ता पहिली ते दहावीसाठी खान अकॅडमीची जागतिक दर्जाची आणि महाराष्ट्र राज्य अभ्यासक्रम ाशी संलग्न असणारी गणित आणि विज्ञान विषयक शैक्षणिक सामग्री (डिजिटल कंटेंट) अध्यापन-अध्ययन प्रक्रियेत समाविष्ट केली जाईल. ही शैक्षणिक सामग्री मराठी व इंग्रजी भाषेत उपलब्ध असणार आहे. यातील व्हीडिओ वापरून शिक्षक वर्गामधील अध्यापन अधिक समृद्ध करू शकतील तसेच विद्यार्थ्यांना व्हिडिओ-आधारित धडे आणि सराव प्रश्नांच्या म ाध्यमातून शाळेत व घरच्या घरी संकल्पनात्मक आकलन दृढ करण्याची संधी मिळेल.

या भागीदारीचा भाग म्हणून, खान अकॅडमी इयत्ता सहावी ते दहावीसाठी असणारी विज्ञान विषयक शैक्षणिक सामग्री आता इंग्रजी आणि मराठी भाषेत तसेच महाराष्ट्र राज्य मंडळाशी संलग्न स्वरूपात उपलब्ध करून देणार आहे. याशिवाय, राज्यस्तरीय शिष्यवृत्ती परीक्षांसाठी मराठी व इंग्रजी भाषेत शिष्यवृत्ती तयारी अभ्यासक्रम उपलब्ध करण्यात आला आहे. डिजिटल संसाधने वापरून अध्यापन प्रभावी करता यावे आणि विद्यार्थ्यांना सर्वांगीण शिक्षणाचा अनुभव देता यावा या उद्देशाने राज्यातील सर्व शिक्षकांना कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित अध्यापन सहायक 'घहरपाळसे' म ोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. हा कार्यक्रम राज्य शिक्षण विभाग (शालेय शिक्षण आयुक्त यांच्या नेतृत्वाखाली) आणि महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने राबविला जाणार आहे. याचे सनियंत्रण जिल्हा शिक्षण अधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) यांच्या देखरेखीखाली, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या साहाय्याने केले जाईल. यासाठी वास्तव-वेळेतील माहिती देणारा रियल टाइम प्रोग्राम डॅशबोर्ड वापरला जाईल. यामध्ये विद्यार्थ्यांचा वापर, अध्ययनात घालवलेला वेळ व अध्ययन निष्पत्ती यांची माहिती मि ळेल. यामुळे विद्यार्थ्यांनी केलेल्या प्रगतीचे पारदर्शक पद्धतीने निरीक्षण करता येईल. 'डॉ. जयंत नारळीकर गणित आणि विज्ञान शिक्षण वृद्धी कार्यक्रम' राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना समान संधी देत उच्च-गुणवत्तेची आणि जागतिक दर्जाची शैक्षणिक सामग्री उपलब्ध करून देईल. प्रत्येक विद्यार्थी, त्याच्या भौगोलिक स्थान व पार्श्वभूमीची पर्वा न करता, गणित आणि विज्ञान या भविष्योन्मुख विषयांम ध्ये मजबूत पाया तयार करू शकेल. या उपक्रमाद्वारे भौगोलिक व साधनसंपत्तीच्या अडचणी दूर करून, लाखो विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, कुतूहल आणि महत्वाकांक्षा यांसह शिकण्याची संधी उपलब्ध होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

# बोरीवली ग्रामपंचायतीने केली विविध विकासकामांना सुरुवात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : वाढत्या नागरीकरणाम ुळे चर्चेत असलेल्या भिवंडी तालुक्यातील बोरीवली ग्रामपंचायतीने विविध ठिकाणी विकासकामांना सुरुवात केली असून बोरीवली ग्रामपंचायतील हद्दीतील नागरिकांच्या वतीने परिसरात समाधान व्यक्त होत आहे. यावेळी रस्ता दुरुस्ती करण्यात आली असून, नवीन रस्ते तर विविध ठिकाणी स्वच्छतेला सुरुवात करण्यात आली असून, समतानगर बौद्ध वस्तीत खुर्च्या वाटप करण्यात आल्या. तर आनंद नगर आदिवासी वस्तीत भांडी वाटप करण्यात आली. तर बोरीवली ग्रामपंचायत हद्दीमधील विविध ठिकाणी पथदिवे लावण्यात आले आहेत. तर बोरीवली ग्रामपंचायतिचे दुरुस्ती, पत्रा शेड टाकला असून, रंगरंगोटीचे काम सुरू आहे. यावेळी बोरिवली ग्रामपंचायतिचे सरपंच अनवर पिंजारी, तसेच पंचायत अधिकारी गणेश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली विविध विकास कामे सुरू असून अधिक कामांना गती मिळणार आहे.तर गावच्या समस्या सोडविण्यासाठी बोरीवली ग्रामपंचायत पुन्हा एकदा सज्ज झाली आहे.





# विश्व हिंदू परिषद, बजरंग दल पंढरपूर यांच्या वतीने माढा तालुक्यातील पूरग्रस्तांना मदत





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सप्टेंबर महिन्यामध्ये सोलापूर जिल्ह्यात माढा तालुक्यातील पूर आला. तुझ्या पुरामध्ये मोठ्या प्रमाणात नागरिकांच्या घरातील सामानाची नुकसान झाले. त्यामुळे ती आर्थिक संकटात सापडले व त्यांना मदत म्हणून विश्व हिंदू परिषदेचे प्रांत मंत्री श्री किशोरजी चव्हाण, आणि गुजरात येथील नरुडेश्वर स्वामी समर्थ देवस्थान यांच्या संयुक्त तसेच पंढरपुरात विश्व हिंदू परिषद, व बजरंग दल च्या वतीने आवश्यक वस्तूंचे १७० किट कुटुंबांना भेट देण्यात आले.

माढा तालुक्यात दारफळ आणि निमगाव मध्ये पूर असल्यामुळे अनेक नागरिकांच्या घरात पाणी गेले. त्यांना स्थलांतर करण्यात आले व त्यांच्या घरातील सर्व जीवनावश्यक वस्तू वाहून गेल्या. व त्यांना मदत करावी असे आव्हान जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

सोलापूरचे जिल्हाधिकारी यांनी केलेल्या आव्हानास पंढरपूर येथील विश्व हिंदू परिषद, बजरंग दल यांच्याकडून दारफळ आणि निमगाव येथील कुटुंबीयांना जीवनाशक वस्तूचे एक लाख ७० हजार रुपयांचे किड देण्यात आले या एका किटमध्ये १९ जीवनावश्यक वस्तू एकत्र करून १००० किमतीचे १७० किट देण्यात आले. यावेळी गुजरात येथील गरुडेश्वर स्वामी समर्थ देवस्थानचे कार्यकर्ते श्री व सौ गुप्तेजी,सौ अन्नपूर्णा मॅडम तसेच विभाग सहमंत्री श्री विजयकुमार पिसे सहमंत्री गोपाळ सुरवसे बजरंग दलाची कार्यकर्ते अक्षय मेनकुदळे विठ्ठल अभंगराव, जय सुरवसे, सत्यजित कळकुंबे, गोपाळ सुगंधी, उज्वल मोहोळकर अविनाश कळकुंबे चैतन्य कुलकर्णी माही रजपूत आदी उपस्थित होते.

**येवला येथे कार्यक्रमाचे आयोजन**

**मंत्री छगन भुजबळ यांचे प्रतिपादन**

# मुक्तीभूमी, दीक्षाभूमी, चैत्यभूमी प्रेरणादायी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

येवला : मुक्तीभूमी, दीक्षाभूमी, चैत्यभूमी या प्रेरणाभूमी आहेत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी येवला या मुक्ती भूमीतूनच धर्मांतराची घोषणा केली. त्यामुळे या भूमीला अनन्यसाधारण महत्त्व आहे, असे प्रतिपादन राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १३ ऑक्टोबर १९३५ रोजी येवला येथे धर्मांतराची घोषणा केली आणि या घटनेला आज ९० वर्षे पूर्ण झाली. यानिमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे मार्फत येवला येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे मंत्री छगन भुजबळ, बार्टीचे म हासंचालक सुनील वारे यांच्यासह अन्य मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी भुजबळ यांनी मुक्तीभूमी स्मारकाच्या



विकासाची माहिती देत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवना-तील महत्त्वाच्या तीन भूमी ज्यामध्ये प्रथम मुक्ती भूमी, द्वितीय दीक्षाभूमी आणि तृतीय चैत्यभूमी यापैकी येवला येथील मुक्ती भूमीचा विकास करण्याची संधी प्राप्त झाल्याचे समाधान व्यक्त करत असताना मुक्ती भूमी स्मारकाचे हस्तांतरण डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे ला केल्याचे प्रतिपादन केले. बार्टीकडे हस्तांतरित झालेल्या स्मारकामध्ये महाम ानवांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार करण्याकरिता या ठिकाणी नवीन पुस्तक स्टॉल आजपासून सुरू करत असल्याचे बार्टीचे महासंचालक सुनील वारे यांनी सांगितले. महामानवास अभिवादन करण्यासाठी आलेल्या अनुयायांची स्मारक भूमीमध्ये कोणतीही गैरसोय होऊ नये म्हणून बार्टी तसेच स्थानिक प्रशासनाकडून व्यवस्था करण्यात आ-लेली होती.

यावर्षी कार्यक्रमाच्या नियोजनाकरिता बार्टीचे येवला स्मारक, बार्टी मुख्यालय कर्मचारी व सुरक्षा रक्षक तसेच सम तादूतांनी विभागप्रमुख डॉ. बबन जोगदंड व निबंधक इंदिरा अस्वार यांच्या म ार्गदर्शनाखाली व स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने उत्तम नियोजन केले होते. धर्मांतर दिन सोहळा यशस्वी होण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापक श्री सुमेध थोरात, प्रकल्प अधिकारी रेखा बोर्डे, सचिन नांदेडकर यांच्यासह बार्टीतील कर्मचारी व समतादुत यांनी परिश्रम घेतले.




# कवळी येथे महाआरोग्य शिबीर संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : आज रोजी मौजे कवळी तालुका औसा जिल्हा लातूर येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत व माजी वसुंधरा अभियानांतर्गत स्वस्त नारी सशक्त परिवार गावामध्ये निमिया ग्रस्त महिलांची संख्या किती आहे हे समजण्यासाठी महिलांचे हिमोग्लोबिन सीबीसी तपासणी करण्यासाठी शासकीय आरोग्य उपकेंद्र यांच्याकडून शिबिराचे आयोजन करण्यात आले या शिबिरास महिलांचा मोठ्या प्रमाणात सहभाग दिसून आला.

यावेळी गावातील महिलांची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली सदरील शिबिरास सरपंच राहीबाई लहू जगताप, उपसरपंच सुनिता महादेव जगताप सदस्य विनिया गोविंद शिंदे, स्वप्नाली विठ्ठल गायकवाड, सुशिलाबाई शेषराव माळी, निवृत्ती संभाजी भिसे, समाधान बाबुराव जगताप, शिवाजी लहू करंडे, ग्रामविकास अधिकारी एन टी रायफळे व गावातील सर्व नागरिक मोठ्या संख्येने उप-स्थित होते. उपस्थित होते व या सर्वांचे सहकार्याने शिबिर यशस्वी झाले.